पाली दान ते आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचे भुयारीकरण ३१८ दिवसांत पूर्ण

# मेट्रो-३ मार्गातील पाचवा बोगदा पूर्ण

म. टा. विशेष प्रतिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सि या मेट्रो-३ मार्गातील अत्यंत ळीच्या आणि महत्त्वपूर्ण असणा पाली मैदान ते आंतरराष्ट्रीय ानतळापर्यंतचे १.१३ किमीचे भुयकरण अवघ्या ३१८ दिवसांत पूर्णरण्यात आले. या मेट्रो मार्गातील र्ण झालेला हा पाचवा बोगदा आहे

मेट्रो-३चे सात प्पे (पॅकेज) करण्यात आले हेत. त्यापैकी पॅकेज ७ मधील तिया भुयारीकरण टप्प्याचे बुधवारी नावरण झाले. छत्रपती शिवाजी महज आंतरराष्ट्रीय विमानतळ - टर्मिन२ या ठिकाणी हे काम पूर्ण झाले१५० निष्णात इंजिनीअर, तंत्रज्ञ आकुशल कामगार यांच्या मेहनतीमुळे केज ७ मधील डाऊन मार्गावर ९३आरसीसी सिमेंट रिंगसचा वापर करत ल्ल १.३१ किमी पल्ला गाठण्यात आ.

मरोळ नाका आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यानचबेसाल्ट, ब्रेशिया अशा प्रकारच्या वोण खडकांना भेदण्याचे काम 'वैनगंगा-३' या टनेल बोअरिंग मशीनने २ एप्रिल २०१८ पासून सुरू केले. शांघाय टनेलिंग इंजिनीअरिंग कंपनीने तयार केलेले हे मशीन ९२ मीटर लांबीचे असून प्रतिदिन ४.१२ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरण करते. या मशीनने सध्या कार्यरत असलेला मेट्रो मार्ग १ आणि सहार उन्नत मार्ग यासारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या भुयारीकरणाचे काम याआधी पूर्ण केले आहे.

मुंबई मेट्रो-३ चे पॅकेज ७ हे मरोळ नाका येथे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो-१ आणि जेव्हीएलआर येथे प्रस्तावित स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-कांजुरमार्ग-विक्रोळी मेट्रो-६ यांना जोडणार आहे. तसेच मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेने न जोडली गेलेली एमआयडीसी, सीप्झ यासारखी महत्त्वाची औद्योगिक आणि रोजगार केंद्रेही जोडणार आहे.



## २० किमी भुयारीकरण पूर्ण

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पूर्ण प्रकल्पातील ५२ किमीपैकी २० किमी भुयारीकरण पूर्ण झाले असून पॅकेज-७ मधील ५० टक्के भुयारीकरण (३.५७ किमी) पूर्ण झाले आहे. पॅकेज-७ चे हे काम एल अँड टी आणि शांघाय टनेल इंजिनीअरिंग कंपनी समूह करीत आहेत.

> “ मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अनेक आव्हानांना समर्थपणे तोंड देऊन यशाचा आणखी एक टप्पा गाठला आहे. भविष्यात मुंबईकरांच्या सेवेसाठी मुंबई मेट्रो-३ मार्गिका मेट्रो-१ आणि प्रस्तावित मेट्रो-६ मार्गिकेला जोडली जाणार आहे.
>
> - अश्विनी भिडे,
> व्यवस्थापकीय संचालक,
> मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन